


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक २५, गुरुवार १२ डिसेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# पारनेरातील शिवसेनेच्या सर्वच कार्यकारिणींची लवकरच पुनर्रचना

**■ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका ताकदीने लढविणार ■ शिवसेनेत प्रवेश करण्यासाठी अनेकजण इच्छुक ■ जिल्हाध्यक्ष अनिल शिंदे व प्रवक्ते संजीव भोर यांची माहिती**

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील शिवसेनेच्या (शिंदेगट) सर्वच कार्यकारिणींची लवकरच पुनर्रचना करण्यात येणार असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकाही मोठ्या ताकतीने लढविणार आहे. शिवसेनेत (शिंदे गट) येण्यासाठी अनेक जण इच्छुक असल्याची माहिती शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल शिंदे व प्रवक्ते संजीव भोर यांनी दिली.**

शिवसेनेचे मुख्य नेते व माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पार पडलेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये महायुतीने घवघवीत यश मिळविले आहे. तळागाळातील माता भगिनींना दिलासा देणारी लाडकी बहीण योजना एकनाथ शिंदे यांनी आणली.आपल्या मुख्यमंत्री पदाच्या काळात शिंदे यांनी जनकल्याणाच्या अनेक योजना आणल्या. आता नवीन सरकारमध्ये एकनाथ शिंदे यांनी नुकतीच उपमुख्यमंत्री पदाची धुरा हातात घेतली आहे. शिंदे यांची सर्वसामान्यांत थेट मिसळून काम करण्याची पद्धत व कार्यकर्त्यांना भक्कम पाठबळ देण्याचे त्यांचे धोरण यामुळे संपूर्ण राज्यात शिवसेनेमध्ये मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते, पदाधिकारी



शिवसेनेत प्रवेश करण्यासाठी उत्सुक असल्याचे चित्र आहे.

याच पार्श्वभूमीवर पारनेर तालुका शिवसेनेमध्येही अनेक ताकतीचे कार्यकर्ते,पदाधिकारी प्रवेश करण्यासाठी इच्छुक आहेत. विधानसभा निवडणुकी दरम्यान तत्कालीन तालुकाप्रमुख विकास उर्फ बंडू रोहकले यांनी जाहीरपणे खा. नीलेश लंके यांच्याबरोबर गेल्याने तालुक्यातील शिवसेना समर्थकांमध्ये काहीसे संभ्रमाचे वातावरण आहे.अशा परिस्थितीत शिवसेनेच्या तालुक्यातील सर्व कार्यकारण्या सद्यस्थितीत स्थगित आहेत.

शिवसेनेचे प्रदेश प्रवक्ते संजीव भोर पाटील, जिल्हाप्रमुख अनिल शिंदे व प्रदेश सचिव संजय मोरे समन्वयाने लवकरच पारनेर तालुका शिवसेनेच्या युवासेनेसह सर्व कार्यकारिणींची पुनर्रचना करणार आहेत.पक्षात येऊ इच्छिणाऱ्या सर्व पदाधिकाऱ्यांनाही सन्मानाने सामावून घेत या पुढील काळात शिवसेनेची अतिशय मजबूत कार्यकारणी करण्यात येईल.आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांसाठी पारनेर तालुक्यात पक्षाची मोठी ताकद उभी करून राज्यातील सर्वसामान्य जनतेचे नेतृत्व म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हात बळकट करण्यासाठी पारनेर तालुका शिवसेना काम करील.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत कार्यरत होऊ इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांना त्यांच्या क्षमतेप्रमाणे योग्य ती संधी व सन्मान दिला जाईल असेही यावेळी शिवसेना प्रवक्ते संजीव भोर यांनी सुचित केले आहे. दरम्यान कोणीही उलट सुलट बातम्या देऊन जनतेत गैरसमज पसरवू नये अन्यथा अशा व्यक्तींवर पक्ष शिस्तीनुसार कारवाई करण्यात येईल अशी तंबीही देण्यात आली आहे.

# शरद पवारांवरील खालच्या टीकेवर अजित पवारांनी तरी बोलावं

## युगेंद्र पवार यांनी व्यक्त केली खंत

**बारामती : प्रतिनिधी**

**"आम्ही एकेकाळी एकत्र होतो असे काही सहकारी आता महायुतीत आहेत. त्यामुळे त्यांनी महायुतीच्या वरिष्ठांना सांगितले पाहिजे, असे बोललेलं त्यांना आवडणार नाही. हे त्यांनी सांगितले पाहिजे", असे युगेंद्र पवार म्हणाले.**



भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्याकडून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्यावर अतिशय खालच्या शब्दांत टीका करण्यात आली. त्यांच्या टीकेबाबत आज शरद पवार गटाचे नेते युगेंद्र पवार यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी आपले काका तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सुनावलं. "गोपीचंद पडळकर काय बोलले मी ऐकलं नाही. त्यांच्याकडून आम्ही वेगळं काही अपेक्षित करू इच्छित नाही. वाईट याचं वाटतं कारण ते महायुतीत आहेत. महायुतीत राष्ट्रवादी पक्ष देखील आहे. त्यांनी यावर आक्षेप घेतला पाहिजे. शरद पवार हे एक ज्येष्ठ व्यक्तिमत्व आहेत. राज्यातील आणि देशातील लोक त्यांचा आदर करतात. ही महाराष्ट्राची संस्कृती नाही", असे युगेंद्र पवार म्हणाले.

"आम्ही एकेकाळी एकत्र होतो असे काही सहकारी आता महायुतीत आहेत. त्यामुळे त्यांनी महायुतीच्या वरिष्ठांना सांगितले पाहिजे, असं बोललेलं त्यांना आवडणार नाही. हे त्यांनी सांगितले पाहिजे. विधानसभेच्या निवडणुकीत अशी लोक निवडून येतात, चांगली माणसं ज्यांना आम्ही समजतो, चांगली लोक निवडून गेली नाहीत. अशी लोक विधानसभेत जातात हे कुठेतरी बदललं पाहिजे. असे माझं मत आहे", अशी प्रतिक्रिया युगेंद्र पवार यांनी दिली.

**मंत्रिमंडळ विस्तारावर टोला**

युगेंद्र पवार यांना यावेळी मंत्रिमंडळ विस्ताराबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी प्रतिक्रिया दिली. "तीन पक्षांनी मिळून एकत्रित सरकार स्थापन केलं आहे. त्यांच्याकडे बहुमत आहे. त्यामुळे त्यांना वेळ लागत असेल", असा टोला युगेंद्र पवार यांनी लगावला. यावेळी युगेंद्र पवार यांना शरद पवार गटाच्या बैठकीबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी "मी या बैठकीत नव्हतो. निवडून आलेले खासदार होते. तिथे काय झालं हे आज मी समजून घेईन", अशी प्रतिक्रिया दिली.

मविआ आमदार महायुतीच्या संपर्कात?

महाविकास आघाडीचे आमदार आपल्या संपर्कात असल्याचा दावा महायुतीच्या नेत्यांकडून केला जातो. याबाबत युगेंद्र पवार यांना प्रश्न विचारण्यात आला. "ते संपर्कात असतील किंवा नसतील याबाबत मला माहित नाही. पण मला वाटत नाही की ते महायुतीच्या संपर्कात असतील. काही ठराविक लोक चर्चा करतही असतील, पण यात काय चुकीचं आहे. राजकारणापलिकडचे काही संबंध असतात", असे युगेंद्र पवार म्हणाले.

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्र लढणार?**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महाविकास आघाडी म्हणून एकत्र लढणार का? या प्रश्नाचं देखील युगेंद्र पवार यांनी उत्तर दिलं आहे. "पक्ष फुटल्यानंतर या निवडणुका येत आहेत. आता या सगळ्या निवडणुका ताकदीने लढवाव्या लागतील. कार्यकर्त्यांना ताकद द्यावी लागेल. संघटन मजबूत करावं लागेल. स्वच्छ प्रतिमेच्या युवकांना आणि युवतींना संधी द्यावी लागेल. हे जर करू शकलो तर इथे पक्षाची ताकद वाढेल. अजून निवडणूका जाहीर झालेल्या नाहीत. तेव्हा आम्ही सगळे एकत्रित बसून पुढे ठरवू", असं युगेंद्र पवार म्हणाले.

'अजित पवारांना भेटल्यावर शुभेच्छा देणार'

युगेंद्र पवार यांना यावेळी अजित पवार यांच्या नागरी सत्काराबाबतही प्रश्न विचारण्यात आला. "अनेक वर्षांपासून अजित दादा इथे निवडून येत आहेत. या अगोदरही त्यांचा नागरी सत्कार झालेला आहे. त्याच पद्धतीने सत्कार आहे, यात गैर काही नाही. अजून दादांची माझी भेट झाली नाही, झाली तर त्यांना शुभेच्छा देईन", असे युगेंद्र पवार यांनी सांगितले.

# राज्यात १८ डिसेंबरपर्यंत कडाका जाणवणार

## धुळ्यात नीचांकी ४, तर संभाजीनगर जिल्ह्यात तापमान १२.२ अंशावर । तीन दिवस थंडीची लाट राहणार

**मुंबई : प्रतिनिधी**

**उत्तरेकडील राज्यांमध्ये १० ते १४ डिसेंबर पर्यंत थंडीची लाट कायम राहणार आहे. त्यामुळे उत्तरेकडून येणाऱ्या थंड हवेमुळे महाराष्ट्रात देखील त्याचा परिणाम दिसून येत आहे. उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात थंडी वाढली आहे. येत्या दोन ते तीन दिवसात तापमानात कमलीची घसरण होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला**



**आहे. राज्यात इतर भागात देखील तापमानात घसरण होण्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे.**

नाशिक जिल्ह्यात उर्वरीत पान ३ वर

# तु आरोपींना ओळखले का?

## वकिल आढाव दाम्प्याच्या हत्येतील माफीच्या साक्षीदाराची उलट तपासणी पुर्ण

**नगर : प्रतिनिधी**

**राहुरी तालुक्यातील उंबरे येथे झालेल्या वकिल दाम्प्याच्या हत्याकाडातील माफीचा साक्षीदार असलेल्या हर्षद ढोकणे याची (दि.११ ) येथील जिल्हा न्यायालयात उलट तपासणीची साक्ष पुर्ण झाली आहे. ॲड. सतीश वाणी यांनी ही उलट तपासणी घेतली आहे.**



२६ जानेवारी रोजी राहुरी तालुक्यातील उंबरे येथे ॲड. राजाराम आढाव आणि त्यांच्या पत्नीची हत्या करुन मृतदेह विहीरीत टाकून दिले होते. त्या गुन्ह्याचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण शाखेने करन त्याचे दोषारोपपत्र जिल्हा न्यायालयात दाखल करण्यात आले. येथील जिल्हा न्यायालयात या खटल्याच्या सुनावणीला दि.९ डिसेंबर पासून सुरुवात झाली उर्वरीत पान ३ वर

# अजिंक्य रहाणेची तुफानी खेळी

## फक्त १३ चेंडूंत साकारलं दमदार अर्धशतक । मुंबई उपांत्य फेरीत दाखल



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**अजिंक्य रहाणेच्या तुफानी खेळीच्या जोरावर मुंबईला बीसीसीआयच्या सय्यद मुश्ताक अली टी २० स्पर्धेची सेमी फायनल गाठता आली. अजिंक्य रहाणेने यावेळी तुफानी खेळी साकारली. अजिंक्यने यावेळी फक्त १३ चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले. मुंबईने यावेळी विदर्भाचे २२२ धावांचे आव्हान सहा विकेट्स राखत पूर्ण केले आणि सेमी फायनलमध्ये दमदार एंट्री केल्याचे पाहायला मिळाले.**

अजिंक्य रहाणेने आपल्यामध्ये अजून किती टी २० क्रिकेट शिल्लक आहे, याचा उत्तम वस्तुपाठ दाखवून दिला. विदर्भाने २२१ धावा उभारल्या तेव्हा मुंबई विजय मिळवेल की नाही, याती शंका सर्वांना होती. पण अजिंक्य फलंदाजीला आला आणि त्याने सर्व समीकरण बदलले. अजिंक्यने पृथ्वा शॉ याच्या साथीने मुंबईला दणकेबाज सुरुवात करून दिली. मुंबईचे ४ षटकांमध्येच अर्धशतक झाले होते. अजिंक्य आणि पृथ्वी गोलंदाजांची पिसे काढत होते. पण पृथ्वी ४९ धावांवर बाद झाला आणि ही जोडी फुटली. मुंबईला यावेळी ७ षटकांत ८३ धावांची सलामी मिळाली. पृथ्वी बाद झाला तरी अजिंक्यने धडाकेबाज फटकेबाजी सुरु करत दमदार अर्धशतक झळकावले. अजिंक्य आता शतक झळकावणार, असे वाटत होते. पण त्याचवेळी तो बाद झाला. अजिंक्यने यावेळी ४५ चेंडूंत १० चौकार आणि तीन षटाकरांच्या जोरावर ८४ धावांची वादळी खेळी साकारली. अजिंक्यने यावेळी १० चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने १३ चेंडूंमध्ये ५६ धावा यावेळी केल्या.

मुंबई आणि विदर्भ यांच्यात सय्यद मुश्ताक अली क्रिकेच स्पर्धेचा उप उपांत्यपूर्व सामना रंगला होता. उर्वरीत पान ३ वर

# नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांचा रविवारी मेळावा

## ठेवीदारांना उपस्थित राहण्याचे आवाहन

**नगर : प्रतिनिधी**

**अवसायानात निघालेल्या नगर अर्बन बँकेमध्ये अडकलेल्या पाच लाखांपेक्षा वरील ठेवी परत मिळवण्यासाठी ठेवेदारांची संघटित शक्ती निर्माण करण्याची आवश्यकता असल्याने बँकेच्या ठेवीदारांचा येत्या रविवारी (ता. १५) सकाळी ११ वाजता शहरातील महाजन गल्लीतील गायत्री मंदिरात ठेवीदारांचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. बँक बचाव कृती समितीचे सदस्य डी. एम. कुलकर्णी यांनी ही माहिती दिली.**




अर्बन बँकेच्या पाच लाखांच्या आतील ठेवीदारांना त्यांच्या ठेव रकमा प्राप्त झाल्या आहेत. मात्र, त्यापैकी कोणाही ठेवीदाराकडून बँक बचाव कृती समितीला याची माहिती दिली नाही. पोलिसांनी जप्त केलेल्या मालमत्तेच्या लिलावाची प्रक्रियाही थंडावली आहे. ठेवीदारांनी समितीकडे पाठ फिरवल्याने ठेवीदारांच्या दृष्टीने हालचाली थंडावल्या आहेत. यामुळे पाच लाखांवरील ठेवी मिळवण्यासाठी ठेवीदारांच्या संघटित शक्तीची गरज आहे. या संदर्भात माहिती देण्यासाठी हा मेळावा होईल, असे कुलकर्णी यांनी सांगितले.

# पुण्याच्या पालकमंत्रिपदासाठी महायुतीत रस्सीखेच

## अजित पवार आणि चंद्रकांत पाटलांमध्ये सुप्त संघर्ष । दोन दादांपैकी कोण मारणार बाजी?

**पुणे : प्रतिनिधी**

**पुण्याच्या पालकमंत्रीपदावरून उपमुख्यमंत्री अजित पवार आणि भाजपचे आमदार चंद्रकांत पाटील यांच्यात रस्सीखेच सुरू असल्याचे दिसत आहे. पुण्याचे पालकमंत्रिपदासाठी दोन्ही नेते आग्रही असल्याने महायुतीमध्ये मंत्रिपदावरून मतभेद निर्माण होण्याची शक्यता आहे. अजित पवार यांच्याकडे पुण्याचे पालकमंत्रिपद होते. आताच्या सरकारमध्ये देखील त्यांनाच मिळणार की भाजप चंद्रकांत पाटलांना पुण्याचे पालकमंत्री करणार याकडे सध्या लक्ष लागले आहे.**



२०१९ मध्ये अजित पवार महाविकास आघाडीमध्ये होते. त्यावेळी अजित पवार उपमुख्यमंत्री देखील होते आणि पुण्याचे पालकमंत्री देखील होते. मात्र, एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर महाविकास आघाडीचे सरकार गेले आणि महायुतीचे सरकार आले. यामुळे अजित पवारांकडे असलेले पुण्याचे पालकमंत्रिपद देखील गेले. पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील बनले. त्यानंतर अजित पवारांनी देखील बंड करत पक्ष आपल्या नावावर करत महायुतीमध्ये सामील झाले.


अजित पवार महायुतीमध्ये आल्यावर त्यांनी पुण्याच्या पालकमंत्री पदासाठी आग्रह केला आणि त्यांना पालकमंत्रिपद देण्यात आले. चंद्रकांत पाटलांना सोलापूरचे पालकमंत्रिपद देण्यात आले. जेव्हा चंद्रकांत पाटील पुण्याचे पालकमंत्री होते तेव्हा देखील अजित पवारांनी जिल्ह्याच्या प्रशासनावर वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. तसेच अजित पवार मूळ पुण्याचेच असल्याने त्यांचा पुण्यातील उर्वरीत पान ३ वर

# लोकांना न्याय देणाराच निघाला लाचखोर!

## जिल्हा सत्र न्यायाधीशाचा कारनामा

**सातारा : प्रतिनिधी**

**जिल्ह्यात अत्यंत क्लेशदायक घटना घडली असून, न्याय देणाराच लाच प्रकरणात अडकला आहे. पाच लाख रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी जिल्हा सत्र न्यायाधीश धनंजय निकम यांच्यासह इतर तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे सातारा न्यायालयाच्या आवारातच ही घटना घडली आहे. या घटनेत न्यायाधीशानेच लाच घेतल्याने उलटसुलट चर्चा सुरू असून न्याय व्यवस्थेवरील विश्वासाला तडा गेला आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सातारा जिल्हा सत्र न्यायालयात दाखल जामिन अर्जाबाबत मदत आणि जामिन करून देण्यासाठी पाच लाख रुपयांची लाच मिळवण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी जिल्हा सत्र न्यायाधीश धनंजय निकम यांच्यासह इतर तिघांविरोधात तक्रार देण्यात आली होती. सातारा शहर पोलीस ठाण्यात लाचलुचपत प्रतिबंधक कायदा कलम अन्वये चौघांवर गुन्हा दाखल केला आहे. पुणे-सातारा अँटी करप्शन विभागाने संयुक्तिकपणे साताऱ्यात मोठी कारवाई केली आहे.

याप्रकरणी पुणे येथील एका तरुणीने तक्रार दिली होती. त्यानुसार आनंद मोहन खरात (रा. खरातवस्ती, दहिवडी, ता. माण), किशोर संभाजी खरात (रा. वरळी मुंबई), जिल्हा सत्र न्यायाधीश धनंजय निकम आणि अनोळखी एकाविरोधात गुन्हा नोंद झाला होता. हा प्रकार ३, ९ आणि १० डिसेंबर रोजी घडला होता. तक्रारदार तरुणीच्या वडिलांचा जिल्हा सत्र न्यायालयात जामिन अर्ज आहे. यासाठी संशयित एक आणि दोन यांनी जिल्हा सत्र न्यायाधीश निकम यांच्यांशी संगनमत केले. तसंच जामिन अर्जाबाबत मदत करणं, जामिन करून देण्यासाठी न्यायाधीश निकम यांच्यासाठी पाच लाख रुपयांची मागणी केली

जामिनाबाबत पूर्वी ठरलेल्या एमएसईबी कोडमध्ये चर्चा करण्यात आली. तसेच १० डिसेंबर रोजी संशयित आनंद खरात, किशोर खरात आणि त्यांच्यासोबत अनोळखी व्यक्तीने तक्रारदार तरुणीकडे पाच लाख रुपये स्वीकारण्याची उर्वरीत पान ३ वर

# तंत्रमंत्र

## विज्ञानयुगातील बितंबातम्या

सोशल मीडिया म्हणजे नक्की काय? तर वेबसाइट्स किंवा ॲप्लिकेशन्स यासारखे माध्यम, जे वापरकर्त्यांना कंटेंट तयार करण्याची आणि इतरांबरोबर ते शेअर करण्याची सुविधा उपलब्ध करून देते. एकमेकांशी संवाद साधण्यासाठी मेसेज, कमेंट यासारखे वेगवेगळे पर्याय इथे असतात. जेव्हा कॉम्प्युटर आले, तेव्हा ते एकमेकांशी जोडण्याची गरज निर्माण झाली आणि गरजेतून इंटरनेटचा जन्म झाला. जगातील पहिला ईमेल 'रे टॉमलिंसन' या व्यक्तीने १९७१ मध्ये पाठवला होता. आज दिवसाला कित्येक अब्ज ईमेल्सची देवाणघेवाण होते.
सोशल मीडियाचा पूर्वज म्हणता येईल अशा 'बुलेटिन बोर्ड सिस्टिम'ची – BBS ची सुरुवात १९७८ मध्ये झाली. मीटिंगच्या वेळा शेअर करणे, फाइल डाउनलोड करणे, मेसेज पाठवणे अशा सुविधा त्यात होत्या. सोशल मीडियाची खरी सुरुवात १९९७ मध्ये 'सिक्स डिग्रीज' या साइटपासून झाली, असे म्हणता येईल. सिक्स डिग्रीजवर प्रोफाइल तयार करणे, मित्र जोडणे, नवीन लोकांना या साइटवर येण्यासाठी आमंत्रण पाठवणे अशा सुविधा होत्या. त्याच वर्षी AOLसुद्धा सुरू झाले. यात एकमेकांना तत्काळ मेसेज पाठवता येत असत.

**आज प्रत्येक व्यक्ती दिवसभरात सरासरी २ तास २४ मिनिटे सोशल मीडियाचा वापर करतो. पण एक काळ असाही होता की आपल्याला सोशल मीडिया म्हणजे काय हेच माहीत नव्हते. आपले पूर्वज एकेकाळी संदेश पाठवण्यासाठी कबुतरांचा वापर करायचे. जलद दळणवळणासाठी उंट, घोडे यांचासुद्धा वापर होत असे. एक तो काळ होता आणि एक आजचा काळ आहे, जिथे आपण कित्येक गोष्टींसाठी पूर्णपणे सोशल मीडियावर अवलंबून आहोत. ही क्रांती फार कमी वेळात घडली आहे आणि सर्वच जण त्याचे साक्षीदार आहेत...**




### सोशल मीडियाशिवाय जगून तर दाखवा

7

सोशल मीडियाशिवाय आजच्या काळात जगण्याची कल्पनाही करता येत नाही, इतका तो आपल्या दैनंदिन आयुष्याचा हिस्सा बनला आहे. माहिती मिळवण्याचा उत्तम स्रोत, आपले विचार मांडण्याचे अधिकृत व्यासपीठ, आनंद किंवा दुःख वाटून घेण्याचे हक्काचे माध्यम म्हणजे सोशल मीडिया. संकटात मित्रांना हाक मारण्यासाठीसुद्धा याचा वापर होतो आणि खोट्या बातम्या पसरवून इतरांना संकटात टाकण्यासाठीसुद्धा याचा वापर होतो. सोशल मीडिया प्रोफाइल म्हणजे वैयक्तिक रोजनिशी आहे, जी कुणालाही वाचता येते. इथे एकमेकांना न भेटताही सणवार साजरे करता येतात. दूर अंतरावर असणारे आपले जवळचे नातेवाईक सोशल मीडियामुळे दूर वाटत नाहीत. परंतु एकाच घरात असणाऱ्या सदस्यांनीही संवाद साधण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करावा, इतपत याने आपल्या आयुष्यावर पकड घेतली आहे. या नवीन जीवनशैलीला टाळता येणे शक्य नसले, तरी याचा योग्य वापर करणे मात्र आपल्याच हाती आहे.





# अचंबित करणारी सोशल मीडियाची सुरुवात अन् व्याप्ती

### पहिली सोशल मीडिया साईट

1

आज जे सोशल मीडियाचे स्वरूप आहे, त्याची सुरुवात झाली ती पहिली सोशल नेटवर्किंग साइट 'फ्रेंडस्टर'पासून. २००२ मध्ये आलेल्या या साइटने सोशल मीडियाचा चेहरामोहराच बदलून टाकला. कारण फोटो आणि व्हिडिओ शेअर करण्याची सुविधा सर्वप्रथम इथेच उपलब्ध झाली होती. अल्पावधीतच फ्रेंडस्टरला लोकप्रियता लाभली. आपल्यापैकी बऱ्याच जणांनी या साइटचे नाव ऐकले असेल अथवा कदाचित वापरही केला असेल. पण पुढे अनेक प्रतिस्पर्धी या क्षेत्रात आल्याने फ्रेंडस्टरला आपले अस्तित्व टिकवता आले नाही आणि २०१५ मध्ये ही साइट कायमची बंद झाली. आज अस्तित्वात असणारी सर्वात जुनी नेटवर्किंग साइट कोणती आहे माहीत आहे? ती आहे लिंक्डइन!



### लिंक्डइन, मायस्पेस अन् ऑर्कुट

2

२००३ मध्ये आलेल्या लिंक्डइनची लोकप्रियता अद्यापही टिकून आहे. इतर सोशल मीडिया साइट्सपेक्षा लिंक्डइनचे स्वरूप थोडेसे वेगळे आहे. व्यवसाय आणि नोकरीसंबंधित या साइटवर कंपन्यांना आपले पेज तयार करून जॉब पोस्ट करता येतात, तसेच कर्मचाऱ्यांची भरतीसुद्धा करता येते. याच २००३ वर्षी आणखी एक सोशल मीडिया साइट सुरू झाली होती व प्रचंड लोकप्रिय झाली होती, ती म्हणजे 'मायस्पेस'! मायस्पेस सुरू झाल्यापासून अवघ्या दोनच वर्षांत ती सर्वात मोठी नेटवर्किंग साइट बनली. यात असंख्य अशा सुविधा दिल्या गेल्या होत्या, ज्याने तरुणाईला भूल पाडली उदाहरणार्थ, यात कर्सरचा रंग बदलता येत असे, कुणी आपल्या प्रोफाइलवर आल्यास कुठले संगीत वाजावे हे ठरवता येत असे, विविध रंगाची बॅकग्राउंड बदलण्याचीसुद्धा यात सुविधा होती. याच काळात २००४ मध्ये सुरू झालेल्या 'ऑर्कुट'लाही बरीच लोकप्रियता मिळाली. ही साइट ब्राझिलमध्ये आणि भारतात सर्वात जास्त व्हिजिट मिळणारी साइट होती. भारतात सोशल मीडियाचा सुवर्णकाळ ऑर्कुटनेच आणला. पण मायस्पेस आणि ऑर्कुट या दोन्ही सोशल नेटवर्किंग साइट्स एवढ्या लोकप्रिय असूनही काळाच्या ओघात मागे का पडल्या? कारण आता पदार्पण झाले होते एका दिग्गज नेटवर्कचे - फेसबुक!

### दिग्गज फेसबुक

3

२००४ मध्ये मार्क झुकेरबर्गने फेसबुक सुरू केले, तेव्हा त्याला कदाचित कल्पनाही नसेल की फेसबुक इंटरनेट जगताची उलथापालथ करेल. सुरुवातीला फक्त हार्वर्ड विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना एकमेकांशी संवाद साधता यावा एवढाच हेतू फेसबुकच्या निर्मितीमागे होता. परंतु, कालांतराने याची कल्पना लोकांना इतकी आवडली की फेसबुक जगभरात पसरत जाऊन त्याने इतर नेटवर्किंग साइट्सची दुकानेच बंद करून टाकली! फेसबुकच्या वापरकर्त्यांना प्रचंड सुविधा उपलब्ध आहेत. इथे मित्रांशी, नातेवाइकांशी, एवढेच काय तर अनोळखी लोकांशीही संवाद साधता येतो. फेसबुकवर व्यवसाय वाढवता येतो, तसेच आपल्या दैनंदिन जीवनातल्या खासगी गोष्टीही इतरांशी शेअर करता येतात. 'न्यूजफीड' हे फेसबुकचे फीचर क्रांती घडवणारे ठरले. याचा वापर करून अनेक देशांतील सरकारे निवडून आली किंवा पाडलीसुद्धा गेली. जनमत तयार करण्याचे, लोकांना एकत्र आणण्याचे किंवा फूट पाडण्याचे कामही फेसबुक सहजी करू शकते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे फेसबुक आपल्या वापरकर्त्यांच्या गरजा ओळखून वेळोवेळी स्वतःमध्ये सुधार घडवून आणते. हेच या साइटच्या यशाचे गमक आहे.




### टिवटिवही

4

फेसबुकखालोखाल दुसरी सर्वात लोकप्रिय नेटवर्किंग साइट म्हणजे ट्विटर. त्याचे आता एक्स असे नामांतर झाले आहे. याला 'मायक्रोब्लॉगिंग साइट' म्हणूनही ओळखले जाते. एक्सवर कमी शब्दांत पोस्ट टाकता येतात, ज्याला 'ट्वीट' असे म्हणतात. २००६ मध्ये सुरू झालेली ही साइट आजही लोकप्रिय आहे. आपल्याला आपल्या आवडीच्या कलाकारांशी, नेत्यांशी थेट संवाद साधता येतो, या सुविधेमुळे ट्विटर अर्थात एक्स लोकप्रिय झाले. ऑनलाइन बातम्या देणारे माध्यम असेही ट्विटर (एक्स) समजले जाते. इथले ट्रेंड होणारे हॅशटॅग रेडिओ किंवा टीव्हीपेक्षाही जास्त वेगाने काही क्षणात जगभर पोहोचतात.



### एक नजर इन्स्टाग्रामवर

5

आपण मायक्रोब्लॉग साइटबाबत बोलत आहोत, तर tumblrचा उल्लेख करायलाच हवा. टंबलर ही साइट मायक्रोब्लॉग आणि सोशल मीडिया नेटवर्क यांचे मिश्रण म्हणता येईल. पण इथे अपलोड होणाऱ्या अश्लील फोटोमुळे या साइटवर अनेक देशात बंदी आणली गेली. विषय फोटोंचा निघाला आहे, तर एक नजर इन्स्टाग्रामवरही टाकू या. सोशल मीडियावर मध्यंतरी एक विनोद गाजला होता 'पूर्वीची पिढी ग्रामीण बोली बोलत असे, पण आताची पिढी इन्स्टाग्रामीण बोली बोलते.' हे शब्दशः खरे आहे! तरुणाईला इन्स्टाग्रामने प्रचंड वेड लावले आहे. २०१० मध्ये सुरू झालेली ही साइट आपल्या हटके अंदाजामुळे इतकी लोकप्रिय झाली की अल्पावधीतच फेसबुक आणि एक्स यांच्या जोडीला येऊन बसली. फेसबुकने जरी इन्स्टाग्राम विकत घेतले असले, तरी दोन्ही साइट्स वेगवेगळ्याच समजल्या जातात. दोन्हींचा उद्देशही वेगळा आहे. इन्स्टाग्राम फोटो आणि व्हिडिओ शेअर करण्यासाठी ओळखले जाते. इथेही हॅशटॅगचा भरपूर वापर केला जातो, एकमेकांच्या फोटोवर लाइक, कॉमेंट करता येतात आणि मेसेजही पाठवता येतात. इन्स्टाग्रामने एक पाऊल पुढे टाकून 'स्टोरी' ही संकल्पना सुरू केली. एक फोटो किंवा व्हिडिओ विशिष्ट विभागात पोस्ट केल्यास तो चोवीस तास तिथे झळकत असतो. आपले लेटेस्ट अपडेट देण्यासाठी याचा वापर केला जातो आणि हीच संकल्पना पुढे स्नॅपचॅटनेसुद्धा उचलली. २०११ मध्ये सुरू झालेले स्नॅपचॅट हे मल्टिमीडिया मेसेजिंग ॲप आहे. इथे विविध फिल्टर्स उपलब्ध असल्याने स्नॅपचॅटसुद्धा तरुणाईमध्ये चांगलेच लोकप्रिय आहे.

### गुगल फेल गेली?

6

आता सोशल मीडिया विश्वात एवढ्या घडामोडी घडत असताना गूगलसारखी दिग्गज कंपनी या क्षेत्रातही उतरणार, हे साहजिकच होते. इतर नेटवर्किंग साइट्सची, विशेषतः फेसबुकची लोकप्रियता पाहून त्याला टक्कर देण्यासाठी गुगलने आणले 'गूगल प्लस'! याला संक्षिप्त स्वरूपात G+ असे संबोधले जाते. मोठा गाजावाजा करून आलेले जी प्लस मात्र फेसबुकसमोर टिकू शकले नाही. फेसबुकच्या फ्रेंडलिस्टप्रमाणे जी प्लसवर सर्कल्स नावाची संकल्पना होती. बऱ्याच गोष्टी फेसबुकप्रमाणेच होत्या. परंतु लोकांनी याला अत्यंत थंड प्रतिसाद दिला. शेवटी जी प्लस कायमचे बंद झाले. हा आहे आपला सोशल मीडियाचा आजपर्यंतचा प्रवास. या उपरोल्लेखित नेटवर्किंग साइट्सशिवाय यूट्यूब, पिंटरेस्ट, फ्लिकर, कोरा, टिकटॉक, रेडिट हेसुद्धा लोकप्रिय आहेत. व्हॉट्सॲप नेटवर्किंग साइट या विभागात येत नसले, तरी तेही सोशल मीडियाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

# ऋतूंचे अस्तित्व धोक्यात?

**ऋतूंचे अस्तित्व हवामान बदलामुळे संकटात सापडले आहे आणि त्याचवेळी प्रदूषण आपल्याला आजारी पाडणारे वातावरण तयार करत आहे. सकाळ आणि सायंकाळी कानावर पडणारा पक्ष्यांचा किलबिलाट, सकाळी सकाळी अंगावर पडणारी सूर्याची कोवळी किरणे यासारख्या मनाला शांतता प्रदान करणाऱ्या गोष्टी आता इतिहासजमा झाल्या आहेत. आता सकाळी पडते काळसर धुके, गुदमरून टाकणारा प्रदूषणाचा विळखा...**

आता धुक्याचे सौंदर्य क्वचितच दिसत आहे. निसर्गाचे मनोहारी दृश्यच नाही तर आता हेमंत ऋतूचाही अनुभव येत नाही. कधीकाळी सहाही ऋतूचा अनुभव देणारे दिवस आता सरले. वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत आणि शिशिर या ऋतूंमध्ये एक वेगळाच आनंद आणि उत्साह लोकांत पाहावयास मिळत होता. गुलाबी थंडीची चाहुल सर्वांनाच सुखावणारी असायची. मात्र आता हिवाळा, उन्हाळा आणि पावसाळा या तीनच ऋतूंचा प्रामुख्याने नागरिक अनुभव घेत आहेत. हेमंत ऋतूचा विचार केला तर हवामान बदलामुळे पावसाळ्याचा कालावधी वाढत आहे. पूर्वी सप्टेंबरपर्यंत पाऊस थांबायचा आणि त्यानंतर थंडीची चाहुल लागायची. परंतु आता ऑक्टोबरपर्यंत पाऊस नित्याने हजेरी लावत आहे. यानंतर तापमान अचानक घसरते आणि ते एकप्रकारे हेमंत ऋतूला कवेत घेणारे ठरत आहे. वास्तविक या काळात १५ ते १६ अंश सेल्सियस तापमान राहताना दिसते, परंतु प्रदूषणामुळे थंडीचा स्पर्श झाला नाही. अशीच स्थिती वसंत ऋतूची देखील आहे. गेल्या तीन-चार वर्षांचा अनुभव पाहिला, तर मार्च ते एप्रिलपासूनच उष्णतेच्या झळा सुरू होतात. परिणामी वसंतचा तर अनुभव येतच नाही केवळ उन्हाची दाहकता वाट्याला येते.





### २०३० ची स्थिती काय असेल?

प्रत्यक्षात मानवी हस्तक्षेपामुळे २०३० पर्यंत जागतिक तापमानात दीड अंश सेल्सिअसपर्यंत वाढ होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. परंतु आताच जागतिक तापमानात १.१ किंवा १.२ अंश सेल्सिअसपर्यंत वाढ झाली आहे. या वाढीची तीव्रता एवढी आहे की भविष्यात दीड अंश सेल्सिअसपर्यंत तापमान वाढल्याने होणारा त्रास आताच होत आहे. प्रत्येक हंगामात त्याचे गांभीर्य कळत आहे. मग दीड अंशांनी वाढ झाल्यानंतर होणाऱ्या स्थितीचा विचार न केलेला बरा. अर्थात अझरबैजान येथील बाकू येथे पार पडलेल्या कॉप-२९ हवामान बदल संमेलनात २०२४ च्या प्रारंभीच्या नऊ महिन्यांत जागतिक तापमान पूर्व औद्योगिक शतकाच्या सरासरी दीड अंश सेल्सिअसपेक्षा अधिक नोंदले गेल्याचे सांगण्यात आले. याच कारणामुळे हवामानाच्या तीव्रतेचा आपण अनुभव घेतला. अडचणीची बाब म्हणजे अशा प्रकारचे अहवाल जारी केले जातात किंवा परिषदांचे आयोजन केले जाते, तेव्हा सर्वच जण पर्यावरणवादी होऊ लागतात आणि सजग होतात. प्रत्यक्षात सर्वकाही आटोपल्यानंतर सर्वजण शांत होतात आणि अहवालही थंडबस्त्यात जातो.

- २०१७ मध्ये हवामान बदलावर एक सरकार अंतर्गत पॅनलने (आयपीसीसी) आपल्या अहवालात, हिवाळ्यात तुलनेने तापमान अधिक राहत असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे पूर्वीपेक्षा लोकांना कमी थंडी जाणवत आहे. मात्र सध्या अचानक प्रमाणापेक्षा अधिक थंडी जाणवते आहे. अर्थात, यामागे जागतिक तापमान कारणीभूत असून त्यात प्रदूषणाचा देखील मोठा वाटा आहे. परंतु या अहवालाकडे कोणीच लक्ष दिले नाही. परिस्थिती अजून 'जैसे थे'च आहे.
- प्रत्यक्षात हिवाळ्यात गंगा नदीच्या किनाऱ्यावर वातावरण स्थिर असते. ही स्थिती पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, भूतानसारख्या देशांतही दिसते. या स्थिर वातावरणात कदाचित कमी दाबाचा पट्टा तयार झाला, तर हवामानात उलथापालथ होते. परंतु असे चित्र कधीतरीच पाहवयास मिळते. पण या स्थिर वातावरणामुळे प्रदूषण घुटमळत राहते. वास्तविक भारताच्या उत्तर भारतात प्रदूषण ही बारमाही समस्या आहे.
- उन्हाळ्यात हवा गरम झाल्याने ती वर जाते आणि त्यामुळे प्रदूषणाला कारणीभूत असलेले घटक विखुरले जातात आणि हवेची गुणवत्ता फारशी ढासळत नाही; परंतु हिवाळ्यात हवामान स्थिर राहत असल्याने प्रदूषणाची घनता वाढत जाते. उर्वरित कसर पंजाब, हरियाणातील शेतकरी शेतातील कचरा जाळून आणि फटाके फोडून भरून काढतात. दाट धुके आणि प्रदूषणाचे घटक हे एकत्र येऊन काळसर धुक्याची चादर तयार करतात आणि त्यामुळे गुदमरणारे वातावरण तयार होते.

### उपाय काय?

दिल्लीच्या हवेतील गुणवत्तेचा निर्देशांक महिनाभर ४०० ते ५०० राहत असेल तर दिल्लीकर जीवघेण्या आजाराला सामोरे जातील नाही तर आणखी काय होईल. शेवटी या समस्येचे समाधान काय? जेथे प्रदूषणाला खतपाणी घातले जाते, तेथेच त्याचे उत्तर, समाधान आहे. सर्वात पहिले म्हणजे वाळलेली पाने आणि शेणाच्या गोवऱ्यांचा इंधनाच्या रुपातून होणारा वापर थांबविला पाहिजे. आता गावागावात एलपीजी गॅस पोचला आहे. परंतु आजही गरीब ग्रामस्थांसाठी तुलनेने गॅस महागच आहे. तसेच कचऱ्यांचे डोंगर हटविले पाहिजे. राजधानीत असे अनेक प्रकारचे डोंगर असून तेथून मिथेनसारखे धोकादायक गॅस बाहेर पडत असतात. त्यांना बाजूला करण्याबरोबरच सर्व कॉलनी आणि सोसायट्यांना देखील स्थानिक पातळीवर कचऱ्यांचे निर्मूलन करण्यासाठी कॅप्टिव्ह सीव्हेज ट्रिटमेंट प्लँट आणि कॅप्टिव्ह वेस्ट मॅनेजमेंट प्लँट (कचरा व्यवस्थापन) देखील उभारावा लागणार आहे. त्यामुळे घरातला कचरा परिसरातच नष्ट केला जाईल. मोटारगाड्यांपासून होणाऱ्या प्रदूषणाला देखील रोखावे लागेल.



## शॉर्ट न्यूज

### लिपिक व अव्वल कारकून रंगेहाथ पकडले

**कोपरगाव :** वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर कारवाई न करण्यासाठी कोपरगाव तहसील कार्यालयातील लिपिक चंद्रकांत चांडे व अव्वल कारकून योगेश पालवे यांना लाचलुचपत प्रतिबंधात्मक विभागाने रंगेहाथ पकडले. लाचलुचपत प्रतिबंधात्मक विभागाला एका तक्रारदाराने दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी (दि. १०) छापा टाकण्यात आला. १५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना कोपरगाव तहसील कार्यालयातील लिपिक चंद्रकांत नानासाहेब चांडगे व अव्वल कारकून योगेश दत्तात्रय पालवे यांना रंगेहाथ पकडण्यात आले.

### बहुजन समाज पार्टीचे उपोषण

**श्रीगोंदा :** तालुक्यातील पडेगाव येथील प्रियंका नितीन सकट यांना मारहाण करणाऱ्या आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी बहुजन समाज पार्टीच्या वतीने पोलीस अधीक्षक कार्यालय समोर उपोषण सुरू करण्यात आले आहे. महिलांना व दलित कार्यकर्त्यांना अपमानास्पद वागणूक देणाऱ्या पोलीस निरीक्षकावर निलंबनाची कारवाई करावी, गुन्ह्याचा तपास एलसीबी कडे वर्ग करावा अशा मागण्यांसाठी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय समोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले असल्याची माहिती संघटनेचे महाराष्ट्र उपाध्यक्ष वसंतराव सकट यांनी दिले आहे.

### बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचार थांबवा

**संगमनेर :** हिंदू धर्म हा मानवतेची शिकवण देतो. मात्र राजकीय कारणांसाठी बांगलादेशमध्ये हिंदू बांधवांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार होत असून हे अत्याचार थांबवण्यासाठी भारत सरकारने तातडीने राजनैतिक हस्तक्षेप करून बांगलादेश मधील तमाम हिंदू बांधवांना दिलासा द्यावा, अशी मागणी तालुका काँग्रेस व विविध समाजसेवी संस्थांनी केली. यावेळी हिंदूंवरील अत्याचार तातडीने थांबवा, अशी मागणी दुर्गाताई तांबे यांनी केली आहे. संगमनेर तालुका काँग्रेस व विविध समाजसेवी संस्थांच्या वतीने प्रांताधिकारी शैलेश हिंगे यांना निवेदन देण्यात आले.

### मुलीवर अत्याचार फोटो व्हायरलची धमकी

**नगर :** एका मुलीवर अत्याचार करत अश्लील फोटो काढून ते व्हायरल करण्याची धमकी दिल्याचा प्रकार समोर आला आहे. हा प्रकार २०२२ ते २०२४ दरम्यान घडला. याप्रकरणी विजय दिलीप पोकळे असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. पीडितेची २०२२ मध्ये आरोपीशी फोनवरून मैत्री झाली. मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. ते दोघे एकमेकांना भेटत होते. आरोपीने पीडितेशी जवळीक साधत जबरदस्तीने वेळोवेळी अत्याचार केले. त्याने मोबाइलमध्ये तिचे अश्लील फोटोही काढले. अश्लील फोटो व्हायरल करण्याची त्याने पीडितेला धमकी दिली.

### विविध मैदानी स्पर्धेत खेळाडूंनी दाखवले कौशल्य

**केडगाव :**येथील सरस्वती प्राथमिक विद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षाचा बालक्रीडा मेळावा शाळेच्या प्रांगणात उत्साहात पार पडला. झालेल्या विविध क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन आपल्या क्रीडा कौशल्याची चुणूक दाखवली. बालक्रीडा मेळाच्या उद्घाटनाप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून पेमराज सारडा कॉलेजचे क्रीडा विभाग प्रमुख मनोज कोतकर, काजळे सर, शाळेचे मुख्याध्यापक संदीप भोर, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मोहिनी धर्माधिकारी आदींसह शिक्षक वृंद विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाबुराव नगर कृती मंचच्या कार्यकर्त्यांनी स्विकारले ४५० झाडांचे पालकत्व !

- शिरूरच्या बाबुराव नगर परीसरातील झाडे
- शिरूर ग्रामीण ग्रामपंचायत सहकार्य करणार



**शिरुर : सतीश डोंगरे**

**पावसाळा आला की, दरवर्षी झाडे लावा झाडे जगवा ही घोषणा देत शासनाकडून, लोकप्रतिनिधी व सामाजिक संस्था, ग्रुपच्या वतीने मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करण्यात येते. परंतु, त्याच्या संगोपनाची जबाबदारी कोणीही घेत नाही. त्यामुळे ही झाडे उन्हाळ्यात पाण्याअभावी जळून जातात. परंतु,आता शिरूर ग्रामीण ग्रामपंचायतीच्या वतीने बाबुराव नगर परीसरात लावण्यात आलेल्या सुमारे ४५० झाडांचे पालकत्व बाबुराव नगर कृती मंचच्या कार्यकर्त्यांनी स्विकारले आहे.**

बाबुराव नगर कृती मंच ही संघटना सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात काम करीत असते. या संघटनेच्या वतीने आत्तापर्यंत अनेक समाजोपयोगी निस्वार्थ सेवाभावी कामे करण्यात आली आहेत. आता या संघटनेने शिरूर शहराचे उपनगर म्हणून विकसित होत असलेल्या बाबुराव नगर परीसरातील सुमारे ४५० झाडे दत्तक घेतली आहेत. या सर्व झाडांची संगोपनाची जबाबदारी घेऊन अतिशय नेटके नियोजन करत झाडे जगवण्यासाठी संघटनेचे कार्यकर्ते धडपड करताना दिसत आहेत.

झाडे जगवणे ही काळाची गरज आहे. शासनाकडून दरवर्षी वृक्ष लागवडीवर लाखो रुपये खर्च केले जातात. परंतु वृक्ष संगोपन होत नसल्या कारणाने पावसाळ्यात लावलेली झाडे मार्च, एप्रिलच्या पहिल्या आठवड्यातच जळून जातात. पुन्हा त्याच खड्ड्यांनी पावसाळ्यात वृक्षलागवडीचा कार्यक्रम केला जातो. वर्षानुवर्षे असेच चालू आहे. परंतु झाडांचे संगोपन मात्र क्वचितच झालेले पहायला मिळते. त्यातीलच एक म्हणजे शिरूर ग्रामीण ग्रामपंचायतीच्या वतीने बाबुराव नगर परीसरात काही दिवसांपूर्वी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले. त्यातील काही झाडे जळून गेली मात्र आता उर्वरीत झाडांच्या संगोपनाची जबाबदारी बाबुराव नगर कृती संघाच्या शिरुरच्या कार्यकर्त्यांनी आपल्या शिरावर घेतली आहे. हे कार्यकर्ते त्या त्या परीसरातील नागरीकांमध्ये जाऊन झाडे जगविण्यासाठी प्रबोधन करीत आहेत. तसेच झाडांना आळी करणे, पाणी देण्याचे नियोजन, मोकाट जनावरांपासून झाडांचे संरक्षण आदी पातळीवर उत्साहाने काम करीत आहेत.

या झाडांचे पालकत्व स्विकारल्यापासून या सदस्यांचे व झाडांचे एक वेगळेच नाते तयार झाले असून कार्यकर्ते एक दिवस देखील या झाडांकडे दुर्लक्ष करत नाहीत. झाडांबाबत काही प्रश्न असेल तर सर्वजण तातडीने एकत्र येऊन त्यावर उपाययोजना करतात. झाडांबाबत एवढी जागरूक असलेली या परिसरातील ही एकमेव संघटना असून, त्यांनी झाडे संगोपनाचा घेतलेला वसा निश्चितच समाजहिताचा आहे.

### सामाजिक संघटनांनी पुढाकार घेण्याची गरज

**शिरूर ग्रामीण ग्रामपंचायतीने मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केली आहे, मात्र संगोपन करताना मनुष्यबळाअभावी ग्रामपंचायतीला काही अडचणी येत आहेत अशा परिस्थितीत शिरूरच्या बाबुराव नगर कृती मंचच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन या झाडांचे पालकत्व स्वीकारले आहे, ही निश्चितच कौतुकाची बाब आहे. अशाच प्रकारे इतर सामाजिक संघटनांनी ही वृक्ष वाचवण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. अशा संघटनांना ग्रामपंचायतीच्या वतीने संपूर्ण सहकार्य करण्यात येईल.**

**बाबाजी वर्पे**
**उपसरपंच, शिरूर ग्रामीण**

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जनतेला महायुती पाहिजे

# ३ महिन्यात काँग्रेसचे पानिपत

**भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे प्रतिपादन**



**मुंबई : प्रतिनिधी**

**लोकांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुती पाहिजे आहे. ट्रिपल इंजिन सरकार काम करेल, केंद्र, राज्य व आता स्थानिक स्वराज्य संस्थांतही आम्ही चांगले काम करू. पुढील ३ महिन्यात होणार्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जनता काँग्रेसचे पानिपत करेल, असे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.**

बावनकुळे पुढे बोलताना म्हणाले की, मारकडवाडीचे मी उदाहरण दिले आहे. ईव्हीएमने कधी त्यांना साथ दिली तर कधी आम्हाला. त्यांना साथ दिली तर काही बोलत नाही. आम्हाला साथ दिली तर ईव्हीएम मध्ये गडबड बोलतात, असा टोलाही त्यांनी यावेळी बोलताना लगावला आहे.

कर्नाटक सरकारने विधानसभेतील स्वा. सावरकरांचा फोटो काढून राहुल गांधीच्या सावरकरविरोधी भूमिकेला भूमिकेला मूर्त रूप दिल आहे. खरंतर राहुल गांधी देशभरात फिरत असताना सावरकरांच्या विरोधी भूमिका घेत असतात. कर्नाटक सरकारने हे निंदनीय कृत्य केले आहे. हे सर्व होत असताना मात्र उद्धव ठाकरे झोपी गेले आहे, असे म्हणत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे.

पुढे बोलताना बावनकुळे म्हणाले की, सावरकरांच्या मुद्द्यावरुन संजय राऊत सकाळी का बोलले नाही. ते काँग्रेसच्या कळपातून बाहेर का पडले नाही. त्यांच्यासोबत राहिल्याने जनतेने ठाकरेंना धुवून काढले आहे, तरी ते सुधारत नाहीत का?, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

**उद्धव ठाकरेंनी साधे पत्र लिहले नाही**

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, उद्धव ठाकरे बाळासाहेब ठाकरे यांच्या कुठल्याही भूमिकेला पुढे घेऊन जात नाही. सावरकरांचे फोटो काढले तरी किमान मल्लिकार्जुन खर्गे, सोनिया गांधी किंवा राहुल गांधींना साधे एक पत्र लिहिण्याची हिंमतही त्यांनी केली नाही. त्यांनी संध्याकाळपर्यंत पत्र लिहण्याची मी वाट पाहत आहे.

**समन्वयातून मंत्रिमंडळ विस्तार करतील**

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री आहेत. त्यांच्यासारखा समन्वय ठेवणारा नेता दूसरा नाही. शिंदे, पवार, फडणवीस यांनी समन्वय साधून काम केले आहे. त्यांनी कुणावरही अन्याय होणार नाही याची काळजी घेतली आहे. मंत्री मंडळ विस्ताराचाही ते तिघे समन्वय साधतील.

# विजय पवार श्रीगोंदा केसरी किताबाचा मानकरी

**बोरीच्या तुषार सोनवणेवर मात**



**श्रीगोंदा : प्रतिनिधी**

**तालुक्यातील पारगाव सुद्रिक येथे आयोजित तालुकास्तरीय श्रीगोंदा केसरी कुस्ती स्पर्धेत येळपण्याचा विजय पवार विजेता ठरला. अंतिम लढतीत त्याने बोरी गावच्या तुषार सोनवणे यांचा पराभव करीत चांदीची गदा व श्रीगोंदा केसरी किताब पटकावला. स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र केसरी अशोक शिर्के व उपमहाराष्ट्र केसरी संदीप बारगुजे यांच्या हस्ते पार पडले.**

माजी सरपंच गोविंद लक्ष्मण मोटे यांच्यातर्फे चांदीची गदा विशाल पवार, सुधीर पाटील, हर्षवर्धन कोळपे, अरमान खान, सुरज पवार, ओम कुरुमकर, ओम गावडे, रावसाहेब पालवे, संदीप गायकवाड, संभाजी मडके, हर्षल गव्हाणे, यांनी आपल्या वजनी गटात स्वर्णपदके पटकावली. स्पर्धेचे आयोजन नितीन मोरे, रवी कोठारे, नितीन गव्हाणे यांनी केले होते. याप्रसंगी स्पर्धे पंच म्हणून प्रा. संजय डफळ, प्रा. बंटी रंधवे, प्रा. गणेश जाधव, प्रा. शुभम जाधव, प्रा.बाळासाहेब भालेराव यांनी काम पाहिले. प्रा. हांगेश्वर धायगुडे यांच्या सदाबहार कुस्ती निवेदनाने स्पर्धेत रंगत आणली. यावेळी कै. रवींद्र बंडू मोटे यांच्या स्मरणार्थ माजी सरपंच गोविंद लक्ष्मण मोटे यांच्यातर्फे चांदीची गदा देण्यात आली.

माजी सरपंच दत्ता इथापे यांच्यातर्फे प्रत्येक गटात ढाल बक्षीस दिली. महाराष्ट्र केसरी अशोक शिर्के, उपमहाराष्ट्र केसरी संदीप बारगुजे, शिरूर केसरी महेश दुर्गे, महाराष्ट्र चॅम्पियन महाराष्ट्र पोलीस महेश नांदगुडे, राजू मोटे पाटील, चेअरमन शिवाजीराव दानवे, शहाजी मोटे, सरपंच इरफान फिरजादे, शहाजी हिरवे, वस्ताद रावसाहेब ठाणगे, संतोष सोनवणे, श्रीगोंदा केसरी पप्पू दिवेकर, अण्णा गायकवाड, अमोल भोसले, संदीप पवार, जयदीप मगर, सोपान हिरवे, युवराज पवार, नाना हिरवे आदींसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ, मान्यवर, कुस्ती खेळाडू उपस्थित होते.

# कर्जतमध्ये सकल हिंदू समाज बांधवांचा मोर्चा

**जगभरातून टीका आणि निषेध**



**कर्जत : प्रतिनिधी**

**बांगलादेश येथील अल्पसंख्याक हिंदूवर होत असलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ सकल हिंदू समाज कर्जत तालुक्याच्यावतीने निषेध व्यक्त केला असून भारत सरकारने यावर तत्काळ कार्यवाही करण्याची मागणी निवेदनाद्वारे कर्जत तहसीलदार यांना केली आहे. तसेच संन्याशी चिन्मय कृष्णादास यांनी बांगलादेशातील हिंदू बांधवांवरील अत्याचाराचा निषेध केला म्हणून त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला टाकून अटक करण्यात आलेल्या प्रकाराचा देखील निषेध नोंदविला. यावेळी मोठ्या संख्येने हिंदू बांधव उपस्थित होते.**

बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदू समाजावर होत असलेल्या अत्याचाराचा जगभरातून टीका आणि निषेध केला जात आहे. बांगलादेशमध्ये हिंदूंवरील अत्याचाराच्या विरोधात भारतातील हिंदू समाजात प्रचंड रोष आहे. हिंदू समाजात असलेला रोष या ''मानवाधिकार मूक मोर्चाच्या'' माध्यमातून व्यक्त करण्यात आला. भारत सरकारने आंतरराष्ट्रीय स्तरावर योग्य भूमिका घेत अल्पसंख्याक हिंदू हिताचे योग्य ते पाऊल उचलावे, अशी मागणी करण्यात आली.

(पान १ वरून)

## राज्यात १८ डिसेंबरपर्यंत कडाका जाणवणार

काही दिवसांपूर्वी हलक्या स्वरुपात पाऊस पडला होता. त्या काळात ढगाळ वातावरणामुळे नागरिकांना थंडीपासून थोडा दिलासा मिळाला होता. मात्र आता थंडीचा जो पुन्हा एकदा वाढला आहे. नाशिक जिल्ह्यातील तापमान ८ अंशावर घसरले असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे नाशिकमध्ये हाडं गोठवणारी थंडी पडली आहे. पुढील पाच दिवस देखील नाशिकमध्ये असेच वातावरण कायम राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राज्यातील जवळपास सर्वच भागामध्ये तापमान घसरले आहे. मुंबई, नाशिक, जळगाव, नंदुरबार जिल्ह्यात तापमान घसरले असून नाशिक जिल्ह्यामध्ये सर्वात कमी तापमानाची नोंद करण्यात आली आहे.

**राज्यात १८ डिसेंबरपर्यंत कडाका जाणवणार**

उत्तर भारतात आलेल्या पश्चिमी चक्रवातामुळे हिमवर्षाव होत आहे. तसेच वाहणाऱ्या गार वाऱ्यामुळे मध्य प्रदेशापर्यंत थंडीची लाट असून त्याचा परिणाम म्हणून उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, धुळे, नंदुरबार आणि जळगाव जिल्ह्यात थंडीचा कडाका आहे. मंगळवारी राज्यात धुळ्यात नीचांकी ४.०अंश सेल्सिअस तर छत्रपती संभाजीनगरात १२.२ अंश सेल्सियस तापमान होते. आगामी तीन दिवस उत्तर महाराष्ट्रासह राज्यभरात थंडीची लाट तीव्र होणार असून राज्यात १८ डिसेंबरपर्यंत थंडीचा कडाका रहाणार आहे. काही ठिकाणी दवबिंदू गोठण्याची (भू-स्फटिकीकरण) शक्यता असल्याचा अंदाज हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिला आहे.

सातपुड्याच्या कुशीत शेत शिवारात बर्फाची चादर

सातपुड्याच्या कुशीत अतिदुर्गम भागात वसलेल्या डाब गावात (ता. अक्कलकुवा) मंगळवारी दवबिंदू गोठल्याने शेत शिवारात बर्फाची चादर पसरल्याचे दिसून आले. स्थानिक भौगोलिक परिस्थितीचा विचार केल्यास सपाटीपेक्षा तीन ते चार अंशाने येथे तापमान कमी असते.

## तु आरोपींना ओळखले का?

असून प्रारंभी दोन दिवस या गुन्ह्यातील माफिचा साक्षीदार असलेल्या सतीश ढोकणे यांची विशेष सरकारी उज्वल निकम यांनी साक्ष घेतली. आज (दि.११) ॲड. सतीश वाणी यांनी उलट तपासणी घेतली.

तु आरोपींना ओळखले का, मोबाईल वापरला का, घटनेनंतर कोठे गेला होता, पोलिसांनी केव्हा ताब्यात घेतले, गुन्ह्यातील रुमाल दाखविण्यात आला, एटीएम मशील कोठून पैसे काढले, कल्याण मार्गे नगरला आल्यावर त्याने १ हजार ५०० रुपये खर्च केले, अशा विविध प्रश्नांवर उलट तपासणी घेण्यात आली तसेच पोलिसांच्या दबावाला बळी पडून तु ही साक्ष देत आहे का असे विचारल्यावर त्याने नाही असे उत्तर दिले. अशा विविध प्रश्नांवर ॲड. सतीश वाणी यांनी त्याची उलट तपासणी घेतली.

## अजिंक्य रहाणेची तुफानी खेळी

या सामन्यात विदर्भाने प्रथम फलंदाजी केली होती. विदर्भने प्रथम फलंदाजी करताना २२१ धावा केल्या होत्या. त्यामुळे मुंबई विजय मिळवणार की नाही, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले होते. पण मुंबईने यावेळी धडाकेबाज कामगिरी केली आणि त्यांनी विजय साकारत उपांत्य फेरी गाठली.

मुंबईने 'ई' गट साखळीत अव्वल क्रमांक मिळवला होता. त्या वेळी त्यांनी सहापैकी पाच सामने जिंकले होते. श्रेयसने दोनशेच्या स्ट्राइक रेटने ६९.५०च्या सरासरीने एक शतक आणि एका अर्धशतकासह २७८ धावा केल्या आहेत. शिवम दुबे आणि सूर्यकुमार यादवच्या पुनरागमनामुळे मुंबई संघाची ताकद खूपच वाढली होती. त्यामुळेच मुंबईने कामगिरीस महत्त्व देण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळेच बाद फेरीच्या लढतींसाठी निवडलेल्या संघातून शम्स मुलाणीला वगळण्यात आले होते.

## पुण्याच्या पालकमंत्रिपदासाठी महायुतीत रस्सीखेच

प्रशासनावर पूर्वीपासूनच दबदबा राहिला आहे. अजित पवार पुण्याच्या पालकमंत्री पदासाठी आग्रही असण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, पुण्यातील राजकारण हे प्रामुख्याने सहकार क्षेत्रावर अवलंबून आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनेक नेत्यांचे साखर कारखाने तसेच सहकारी संस्था आहेत. त्यामुळे पुण्याचे पालकमंत्री होणे हे अजित पवारांसाठी महत्त्वाचे आहे. अजित पवार जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून आमदारांना निधी देखील उपलब्ध करून देतात. मात्र, आता देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले आहेत त्यामुळे पुण्याचे पालकमंत्रिपद कोथरूडचे आमदार चंद्रकांत पाटील मिळण्याची शक्यता असल्याचे बोलले जात आहे.

## लोकांना न्याय देणाराच निघाला लाचखोर!

तयारी दाखवली होती. त्यानंतर पैसे गाडीत आणून द्या, असं सांगून लाच रक्कम मिळवण्याचा प्रयत्न केला. तदनंतर जिल्हा सत्र न्यायालयाच्या आवारातच या घडामोडी घडल्या आहेत. येथील एका हॉटेलमध्ये सापळा रचून लाचलुचपत विभागाच्या पोलिसांनी सर्वांना रंगेहात पकडले, त्यानंतर कायदेशीर प्रक्रियेद्वारे गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, या घटनेने सातारा जिल्ह्यासह राज्यभरात खळबळ उडाली आहे.

प्रशासन आणि पोलीस यंत्रणांमधील भ्रष्टाचाराच्या घटना वारंवार समोर येत असतात. मात्र, न्यायव्यवस्थेतील वरिष्ठ अधिकारीच अशा प्रकरणात अडकल्याने ही घटना अधिक गंभीर बनली आहे. यामुळे संपूर्ण न्यायव्यवस्थेची पारदर्शकता आणि विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. या घटनेमुळे नागरिकांच्या न्याय हक्कांसाठी कार्यरत राहणाऱ्या व्यवस्थेतील भ्रष्टाचाराची ही घटना गंभीर मानली जात आहे. राज्यभरातून या प्रकरणावर तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, न्यायालयाच्या प्रतिष्ठेला तडा गेल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# पारनेरला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक व्हावे

## अखिल मातंग समाज चळवळची मागणी | जिल्हाधिकारी सालीमठ यांना निवेदन



पारनेर : प्रतिनिधी

**साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक पारनेर तालुक्याच्या ठिकाणी व्हावे अशी मागणी सर्व समाज बांधवानी बैठकीत केली.राणीताई उमाप यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन्न झाली.**

सदर बैठकीमध्ये जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांना निवेदन देऊ असा सर्व समाज बांधवांचा एक मताने ठराव झाला. सदर निवेदनात समाज बांधवांची पारनेर या ठिकाणी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक उभारण्याचा मानस आहे.यासाठी समाज बांधवांनी आपल्या पातळीवर अनेक प्रयत्न केले परंतु जागेचा अभाव व समाजाचे आर्थिक परिस्थिती पाहता ते शक्य झाले नाही. म्हणून मातंग समाज बांधवांनी एक विचाराने बैठक घेऊन आपणास शासकीय जागा उपलब्ध करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक व्हावे अशी मागणी करण्यात आली.

सदर स्मारक उभारणीनंतर त्यामध्ये समाजातील बेरोजगार तरुणांना रोजगार निर्मितीसाठी प्रशिक्षण वर्ग होणार आहे. वाचनालय,आरोग्य शिबीर,शिक्षण विषयक अभ्यास केंद्र,एमपीएससी, यूपीएससी,विद्यार्थ्यांचे विशेष अभ्यास केंद्र होणार असून या माध्यमातून स्मारक उभारण्याचा विचार तालुक्यातील समाज बांधवांचा आहे. जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांना पारनेर तालुक्यातील अखिल मातंग समाज चळवळ यांच्यावतीने निवेदन देण्यात आले.

सदर निवेदन देण्यासाठी संतोष शेलार, सुनील सकट, सतीश साळवे, संजय शेलार, रामदास साळवे, अविनाश उमाप, विशाल साळवे, राजेंद्र अल्हाट, राजेंद्र अवचिते,राजू वैराळ, अशोक ठोंबरे, बबन शेलार, रामदास वायदंडे, संतोष साळवे, मीराताई सरोदे, कृष्णा शेलार, संतोष गायकवाड, महादू मेंगाळ,मनोहर कनिंगध्वज,विकास शेलार, शंकर वायदंडे, मारुती उमाप,प्रकाश साळवे,गणेश राजहंस,पत्रकार सचिन जाधव,पत्रकार संपत वैरागर, युवराज जगताप, प्रदीप अल्हाट,आकाश वायदंडे, शुभम वाकळ व समाजातील बांधव या वेळी मोठया संख्येने उपस्थित होते.

# पारनेरचा पाणी प्रश्न पुन्हा पेटणार

## भूमिपुत्र शेतकरी संघटनेचा मोठा निर्णय | गाव तिथे कृती समिती स्थापन करण्याचा निर्णय

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्याला हक्काचे पाणी मिळावे या मागणीसाठी लढा देण्यासाठी भूमिपुत्र संघटना पुन्हा सरसवली असून गाव तिथे कृती संघटनेच्या शाखा उभारून हा लढा तीव्र करण्याचा निर्धार समितीच्या वतीने करण्यात आला आहे त्यामुळे आगामी काळात पारनेरचा पाणी प्रश्न पुन्हा पेटण्याचे चिन्ह निर्माण झाले आहे.**



पारनेर तालुक्यातील दुष्काळी गावांच्या पाण्याच्या प्रश्नावर विधानसभेच्या निवडणुकांपूर्वी पारनेर तहसील कार्यालयावर संतोष वाडेकर, अशोक आंधळे, बाळशिराम पायमोडे यांनी आमरण उपोषण केले होते व त्यावेळी मिळालेल्या आश्वासनावर पुढील दिशा ठरवण्यासाठी सुपा येथील शासकीय विश्रामगृहावर भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे अध्यक्ष संतोष वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.


आगामी काळात पाण्याचा लढा तीव्र करण्यासाठी सर्वानुमते काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले त्यामध्ये तालुकाभर संपर्क अभियान राबविणे, गाव तिथे कृती समिती स्थापन करून या चळवळीत मोठ्या संख्येने शेतकऱ्यांना सामील होण्याचे आवाहन करून हजारो शेतकऱ्यांना एकत्र करून मार्च, एप्रिल महिन्यात जन आंदोलन करण्याचा सर्वांनुमाते निर्णय घेण्यात आला.

यावेळी बाळशिराम पायमोडे, जिल्हा संघटक संतोष वाबळे, सुभाष पाटील करंजुले, अविनाश देशमुख, तालुकाध्यक्ष मनोज तामखडे, तालुका सचिव अन्सार पटेल, रघुनाथ मांडगे, अरुण बेलकर, प्रवीण खोडदे, अनिल सोबले, ॲड.सचिन कोकाटे, डॉक्टर विलास काळे, सुभाष शिंदे, अंकुश कोल्हे, सचिन बारवकर, राहुल गुंड, आनंदा सोनवणे, संदीप साबळे, संजय भोर, रामदास साठे, चेअरमन संजय भोर, वसंत साठे, नंदन भोर यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुनाटला रविवारी दत्तजयंती सोहळा

## ■ गावात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन ■ संपूर्ण गुनाट गावात दत्तमय वातावरण

शिरूर : प्रतिनिधी



**शिरूर तालुक्यातील दत्त पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गुनाट गावात येत्या रविवारी (दि.१५) दत्तजयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्त गावात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.**

रविवारपासून अखंड हरिनाम सप्ताहास सुरुवात झाली. हभप सुरेश महाराज साठे, हभप केशव महाराज जगदाळे,हभप दयानंद महाराज गिरी, हभप कृष्णा महाराज वडाळीकर, हभप सागर महाराज बोराटे, हभप एकनाथ महाराज चतर शास्त्री, हभप कबीर महाराज आत्तार आदींच्या कीर्तन सेवेबरोबरच हभप पुंडलिक महाराज नागवडे यांच्या काल्याच्या कीर्तनाचे सप्ताहाची सांगता होणार आहे.

पहाटे ४ ते ६ काकडा, सकाळी ७ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, नंतर प्रवचन ४ ते ६, संध्याकाळी हरीपाठ ६ ते ७, हरीकिर्तन ९ ते ११ व हरीजागर रात्री ११ ते ४ या दररोज होणाऱ्या कार्यक्रमामुळे गावात भक्तीमय वातावरण तयार झाले आहे. तसेच दररोज सकाळ दुपार वारकऱ्यांना व संध्याकाळ वारकरी सह संपूर्ण गावकऱ्यांना पंगतीचे आयोजन केले आहे काल्याचे महाप्रसाद जयसिंग गाडे, नामदेव गाडे, मच्छिंद्र भाऊसाहेब करपे, नारायण वाघमारे प्रकाश नामदेव वाघमारे, दत्तात्रय भानुदास सातव यांनी दिला आहे.

मंदिर जीर्णोद्धार मध्ये केलेली धार्मिक मदत व त्यांचे सामाजिक व धार्मिक काम लक्षात घेऊन गुनाट ग्रामस्थांच्या वतीने व दत्त देवस्थानच्या वतीने माजी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रदीपदादा कंद यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. मुख्य दत्त जन्म कार्यक्रम रविवार दि. १५ रोजी पहाटे ४ वाजता होणार आहे. त्यानंतर रात्री ९ वाजता भारुड सम्राट गोविंद महाराज गायकवाड यांचा भारूडाचा कार्यक्रम होणार आहे. दत्त जयंतीनिमित्त संपूर्ण मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

# निघोज सोसायटीच्या उपाध्यक्षपदी संतोष लामखडे बिनविरोध

## संचालक मंडळाच्या बैठकीत एकमताने निवड

निघोज : प्रतिनिधी

**निघोज सेवा सहकारी सोसायटीच्या उपाध्यक्षपदी संतोष किसनराव लामखडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. संचालक मंडळ बैठकीत ही निवड करण्यात आली.**



संस्थेचे चेअरमन सुनिल वराळ यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळ बैठक घेण्यात आली. संस्थेने गेली तीन वर्षात तीन संचालकांना उपाध्यक्ष होण्याची संधी नेतेमंडळींनी दिली आहे. गेली साठ वर्षांपूर्वी ही सहकारी संस्था स्थापन झाली असून शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ देण्यासाठी संस्था पदाधिकारी व संचालक मंडळ यांनी महत्वपूर्ण भूमिका घेतली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी चाबुकस्वार व सोसायटीचे सचिव रामदास भोसले यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले.यावेळी संस्थेचे संचालक दत्तात्रय लंके यांनी उपाध्यक्ष पदाचे नाव मांडले यावेळी उपाध्यक्ष शांताराम लाळगे यांनी सर्व संचालक मंडळाच्या वतीने अनुमोदन दिले.

यावेळी सोसायटीचे पदाधिकारी व संचालक तसेच विविध संस्थांच्या वतीने लामखडे यांचा सत्कार करण्यात आला. मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपकार्याध्यक्ष वसंत कवाद व माजी सरपंच ठकारामशेठ लंके यांच्या नेतृत्वाखाली हे संचालक मंडळ कार्यरत असून गेली तीन वर्षात विविध विकासकामांच्या माध्यमातून सोसायटीचा मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. यावेळी संचालक वसंत ढवण, असिम हवालदार, दिलीप कवाद, अनिल लामखडे आदी सर्व संचालक उपस्थित होते.

यावेळी कानिफनाथ मंडळाच्या वतीने नवनिर्वाचित उपाध्यक्ष संतोष लामखडे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच सोसायटीचे मार्गदर्शक वसंत कवाद व माजी सरपंच ठकारामशेठ लंके यांच्या हस्ते निवडणूक निर्णय अधिकारी चाबुकस्वार यांचा सत्कार करण्यात आला. सोसायटीचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष संतोष लामखडे यावेळी म्हणाले गेली तीन वर्षात पारदर्शक कारभार करीत संस्थेचे चेअरमन सुनिल वराळ यांच्या नेतृत्वाखाली संचालक मंडळांने शेतकऱ्यांना पाठबळ दिले आहे.

संस्थेचे मार्गदर्शक वसंत कवाद व माजी सरपंच ठकारामशेठ लंके यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचा कारभार कार्यक्षमपणे सुरू असून निघोज आणि परिसरातील शेतकरी व सर्व सामान्य जनतेचा विकास होण्यासाठी आपण कटीबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली आहे.

# गायन स्पर्धेत स्वरांजली उनवणेचा प्रथम क्रमांक

## जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील देवीभोयरे येथे झालेल्या तालुका स्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धेत गायन स्पर्धे त निघोज जिल्हा परिषद शाळेची दुसरीची विद्यार्थीनी स्वरांजली रोहन उनवणे हिचा तालुक्यात प्रथम क्रमांक आला असून स्वरांजलीला जिल्हा स्तरावर होणाऱ्या विविध गुणदर्शन स्पर्धेत गायनाची संधी मिळाली आहे.**



निघोज येथे झालेल्या केंद्र स्तरावर झालेल्या स्वरांजली हिचा प्रथम क्रमांक आला होता. केंद्र प्रमुख बाचकर सर मुख्याध्यापक कैलास शिंदे, ज्येष्ठ शिक्षक सुभाष महाराज मगर, शिक्षीका अनिता दिघे, काळे सर, काळोखे सर, सालके मॅडम, कांताबाई मगर मॅडम, तसेच सरला व रोहन उनवणे या आई वडील तसेच आजी मंदा दत्तात्रय उनवणे यांचे मार्गदर्शन मिळाले आहे.

कन्हैया लागला तूझा रे छंद मला हे गाणे गात स्वरांजली हिने उपस्थितांचे मने जिंकली आहेत. स्वरांजली हिचे सर्वत्र कौतुक होत आहे. परिसरातील सर्व जिल्हा परिषद शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक तसेच पारनेर तालुका पत्रकार संघ, पारनेर तालुका मराठी पत्रकार संघ पदाधिकारी व सदस्य तसेच ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.

### शिक्षकांची मेहनत महत्वाची

**जिल्हा परिषद मराठी शाळेतील गुणवत्ता अतिशय चांगल्या दर्जाची असून विविध गुणदर्शन स्पर्धा असो की विशेष करुन स्पर्धा परीक्षा असो यामध्ये शाळेतील शिक्षक अतिशय मोठ्या प्रमाणात मेहनत विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम करीत आहेत. निघोज - जिल्हा परिषद गटातील प्राथमिक शाळांची गुणवत्ता कौतुकास्पद असून केंद्रप्रमुख बाचकर सर व मुख्याध्यापक कैलास शिंदे सर व त्यांच्या सहकाऱ्यांनी तसेच या भागातील सर्व मुख्याध्यापक व शिक्षक यांनी जिल्हा परिषद शाळांचा नावलौकिक वाढविण्यासाठी प्रयत्न केले आहेत.**

**सरपंच चित्राताई वराळ पाटील,**
**उपसरपंच माऊली वरखडे**

# बंधाऱ्यांमुळे गावच्या पाणी पातळीत वाढ होईल- माजी सरपंच बोऱ्हुडे

सुपा : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील नारायणगव्हाण येथील जातेगाव - शिव, शेळके मळा या ठिकाणी मा. खा. डॉ. सुजय विखे यांच्या प्रयत्नातून जलसंधारण महामंडळ विशेष निधीतून या बंधाऱ्याला ६२ लक्ष एवढा भरीव निधी दिला होता. त्या बंधारा कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्याची वर्क ॅर्डर होवुन बंधाऱ्याच्या कामास सुरुवात झालेली आहे.या साठा बंधाऱ्यामुळे शंभर हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. यामुळे मोठा पाणीसाठा होऊन पाण्याची पातळी वाढून गावच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न मिटणार असल्याचे माजी सरपंच सुरेश बोऱ्हुडे यांनी सांगितले.**



सदर बंधाऱ्यामुळे नारायणगव्हाणच्या सर्व विहिरीच्या पाण्याच्या पातळीत वाढ होणार आहे. तसेच गावच्या शेतीच्या व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायम स्वरूपी सुटणार आहे. सदर कामाची प्रत्यक्ष पाहणी करताना गावचे मा. सरपंच तथा पारनेर ग्रामीण पतसंस्थेचे उपाध्यक्ष सुरेश बोरुडे, वडनेर हवेलीचे सरपंच लहू शेठ भालेकर, सोसायटीचे चेअरमन काशिनाथ नवले, बाळासाहेब चव्हाण संचालक गणेश शेळके, संजय शेळके, सेवानिवृत्त शिक्षक डी व्ही गुरुजी अण्णा चव्हाण, मनोज शेळके, सुदाम शेळके आदी यावेळी उपस्थित होते.

# देवीभोयरे शाळेत तालुकास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धा संपन्न

## विविध स्पर्धेत विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग

देवीभोयरे : प्रतिनिधी

**शाळकरी मुलांच्या सुप्त कलागुणांना वाव आणि सराव मिळावा म्हणून प्राथमिक शिक्षण विभाग आणि पंचायत समिती पारनेर यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय विविध गुणदर्शन व सांस्कृतिक या शालेय स्पर्धांचे आयोजन देवीभोयरे येथे करण्यात आले होते. हस्ताक्षर, वक्तृत्व, वेशभूषा व कथा सादरीकरण, वैयक्तीक व सामूहिक गीत गायन अशा पहिली ते सातवी इयत्तेपर्यंतच्या शाळकरी मुलांच्या गटनिहाय विविध स्पर्धांचे सादरीकरण येथे केले गेले.**




या स्पर्धांच्या समारंभाचे उद्घाटन सीमाताई राणे, गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती,पारनेर यांच्या हस्ते करण्यात आले. दयानंद पवार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पारनेर हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अशोकराव मुळे, सरपंच, देवीभोयरे ग्रामपंचायत यांनी गट शिक्षणाधिकारी आणि गट विकास अधिकारी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आणि समारंभास शुभेच्छा दिल्या. गट शिक्षणाधिकारी राणे आणि गट विकास अधिकारी पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

विद्येची देवी सरस्वतीचे पूजन करण्यात आले. तसेच या दिवशीच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदनाही देण्यात आली.यावेळी व्यासपीठावर देवीभोयरे येथील विश्वनाथ बेलोटे अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती, सुभाष बेलोटे, वि.का.सेवा सोसायटी, तुकाराम बेलोटे, अध्यक्ष जगदंबा पतसंस्था, विकास सावंत, अध्यक्ष, श्रीराम पतसंस्था, देवराम पिंपरकर तसेच कांतीलाल ढवळे, विनेश लाळगे, केसकर, शिक्षण विस्तार अधिकारी, तसेच नारायण बाचकर, दौलत येवले, चांगदेव गवळी, राजेंद्र शिंदे, यादव येवले आदी केंद्रप्रमुख हजर होते.

सर्व शिक्षक वृंद, तालुक्यातील विविध शाळांचे विद्यार्थी आणि ग्रामस्थ यांच्यामुळे समारंभाची शोभा वाढली.कार्यक्रमाचे नियोजन जि.प.प्राथमिक केंद्रशाळा देवीभोयरे यांनी चोख ठेवले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कांतीलाल ढवळे यांनी केले. सूत्रसंचालन बाळासाहेब दिघे यांनी तर आभार प्रदर्शन विश्वनाथ गाजरे गुरुजी यांनी केले.

# अर्णव सोनवणे हस्ताक्षर स्पर्धेत केंद्रात प्रथम

## तालुकास्तरीय स्पर्धेसाठी निवड | तनपुरेवाडी शाळेने मिळविले घवघवीत यश



निघोज : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील निघोज येथील जिल्हा परिषदेच्या तनपुरेवाडी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी केंद्रस्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धेत घवघवीत यश मिळविल्याने ग्रामस्थांनी शिक्षक व विद्यार्थाचे कौतूक केले आहे .**

हस्ताक्षर स्पर्धेत किलबिल गटातून अर्णव अंकुश सोनवणे याने तालुका स्तरासाठी प्रथम क्रमांक , बालगटातून अव्दैत्या गणेश कवाद केंद्रात तृतीय क्रमांक , वक्तृत्व स्पर्धेतील किलबिल गटातून श्रेयश मेहेर केंद्रात प्रथम क्रमांकाने तालुकास्तरावर निवड , तर अव्देत्या गणेश कवाद केंद्रात प्रथम तालुकास्तरावर निवड, वैयक्तिक गीत गायन स्पर्धेतील किलबिल गटात आरोही तनपुरे केंद्रात तृतीय क्रमांक , बालगटात कैवल्य योगेश कवाद केंद्रात तालुकास्तरासाठी प्रथम क्रमांक , कथाकथन स्पर्धेत पंकज मोरे केंद्रात तृतीय क्रमांक, सांस्कृतिक स्पर्धेत तनपुरेवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने व्दितीय क्रमांक व समूहगीत गायन स्पर्धेत तालुकास्तरासाठी प्रथम क्रमांक निवड झाली आहे घवघवीत यश मिळविल्याने निघोज परिसरातून कौतूक होत आहे.

**अद्वोता कवादचे दोन्ही स्पर्धेत यश**

निघोज येथील सामाजिक कार्यकर्ते व ग्रामपंचायत विद्यमान सदस्य गणेश कवाद यांची कन्या अद्वैता हिने जिल्हा परिषदेच्या तनपुरेवाडी प्राथमिक शाळेत इयत्ता ४ थी च्या वर्गात शिक्षण घेत नुकत्याच संपन्न झालेल्या केंद्रस्तरीय गुणदर्शन स्पर्धेत सक्रीय सहभाग घेत वकृत्व स्पर्धा व वेशभूषा सादरीकरण या दोन्ही ही स्पर्धेत देवीभोयरे केंद्रात प्रथम क्रमांक पटकावत पारनेर तालुका पातळीवर निवड झाली असून हस्ताक्षर स्पर्धे त ही सहभाग घेत केंद्र पातळीवर निवड होत तृतीय क्रमांक पटकावला आहे.

या घवघवीत यशाचे तनपुरेवाडी शाळेतील सर्व यशस्वी विद्यार्थी चे मुख्याध्यापक गुंड सर शिक्षक दिवसे सर शिक्षिका मोरे मॅडम,भुकन मॅडम, बेलोटे मॅडम, धामणे मॅडम मळगंगा ग्रामीण ट्रस्टचे उपाध्यक्ष वसंत कवाद सर निघोज गावचे माजी सरपंच ठकाराम लंके मळगंगा ग्रामीण ट्रस्ट सहसचिव विश्वासराव शेटे व विश्वस्त विठ्ठलराव कवाद ग्रामपंचायत सदस्य दिगंबर लाळगे ग्रामपंचायत सदस्या सुधामती कवाद, दुष्काळ निवारण समितीचे अध्यक्ष बाळासाहेब लंके, निघोज सोसायटीचे चेअरमन सुनिल वराळ,कवाद शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ लाळगे उपाध्यक्ष संदीप ढोणे यांनी अभिनंदन केले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com